
# नवाकाळ शब्दकोडे-१२६४



**आडवे शब्द –**

१. गाडा, कारभार ४. शोध, धांडोळा ६. आकर्षित ८. पराकाष्ठा १०. स्फूर्ती, प्रेरणा ११. देवांचे गुरू, विद्वान १२. झगडा, भांडण १३. कढ, कंठ दाटून येणे १५. प्रयत्न, प्रयास १६. मधमाशांचे पोळे १८. मोठी नदी २०. शाहिराचे चर्मवाद्य २२. सांडपाण्याचा नाला २४. कुबेराची राजधानी, मुलींचे एक नाव २५. कृष्णपक्षातील अंतिम तिथी ३६. रेसच्या घोड्यांची निगा राखणारा ३८. अंगठा मुरगळून झालेली जखम २९. या वर्षी ३०. तोल, तोरा ३१. गृहकलह ३३. पुनीत, पावन ३६. इच्छा ३८. चेहरा, गुजरातचे एक शहर ४०. शीतल ४१. शेगडीतले इंधन ४२. मनाला मोहवणारे ४३. आवाज ४४. जास्तीत जास्त ४५. मालाला बाजारात असलेला उठाव ४६. बोलणे ४८. दुसऱ्यासाठी घेतलेला त्रास ५०. राजदरबारातले स्तुतिपाठक, भाट ५३. बिजली ५५. बसून खायला सोकावलेला ५८. भीती ५९. पार्वती ६०. ज्योतिषातील एक रास, भयंकर जलचर ६१. हंस पक्षी ६३. शेळीचे पिल्लू ६४. यानंतर, इथून पुढे ६५. माळ ६६. पटांगण ६७. मुक्काम, होडी ६८. अश्व ७०. शांतता, निर्जनता ७३. मोठा ७४. कापसाचे बी ७५. सुती कापडाच्या छपाईचा व रंगकामाचा हस्तव्यवसाय ७५. महाकाय ८१. परंतु ८२. तक्रार, पिरपिर ८४. कुलीन ८६. अस्थिर धोरण ८८. एअर रायफलमधली गोळी ८९. अयोध्यानगरी ९१. उपजत आवड ९३. फणसाची एक जात ९६. संवत्सर, वर्ष ९७. पृष्ठ, पर्ण ९९. अंधार दूर करणारा, सूर्य १०२. असंमती १०४. कलंकित १०६. अफूचे बी १०८. मिठाईवाला ११०. बाष्प १११. पृथ्वी ११२. मद्य ११३. भयभीत, व्याकूळ ११४. माड, श्रीफळ

**उभे शब्द –**

१. बाण २. ठाम व मजबूत ३. टोमॅटोचे टिकाऊ तोंडीलावणे ४. अतिशय कमी किंमतीत ५. गोधडी ६. एक ते तीन पदर असलेला स्त्रियांचा सोन्याचा कंठालंकार ७. टिकाव, निभाव ८. भगवान शंकर ९. एक पालेभाजी/खाद्यतेल १०. ठिणगी ११. पूर्ण नुकसान १४. कल्याण, फायद्याची गोष्ट १७. नाविकाचे दिशादर्शक १९. औषध २१. फसवणूक २३. फेकून देण्याजोगे २४. ओढाळ, चंचल (मन) २६. उघडपणे २७. जहाजाचे स्थानक ३१. लहान मुलींचा लुटुपुटीचा संसार-स्वयंपाक वगैरेचा खेळ ३२. भारताच्या पूर्वेचा समुद्र ३४. आराम, विश्रांती ३५. चेहरा, मुद्रा ३६. प्रशंसनीय, स्तुत्य ३७. साद, हाळी ३९. वैपुल्य, विपुलता ४१. राग, अवकृपा ४५. चोळीचे कापड ४७. कुलूप उघडण्याचे साधन ४९. नवऱ्याचा भाऊ ५१. जमा आणि खर्च यांची बरोबरी ५२. मर्कट ५४. लांब पल्ल्याची तलवार ५५. खोटा आरोप, कुभांड ५६. अपुरा ५७. पुष्करणी, पायऱ्या असलेली विहीर ६०. कुर्ता किंवा साडीचे मऊ उंची वस्त्र ६२. अरण्य, वन ६४. या ठिकाणी ६७. डोंगर ६८. सरड्याच्या जातीचा अवाढव्य प्राणी, गळ्यात पडलेले झेंगट ६९. हडळ ७१. वराह, डुक्कर ७२. नर मांजर ७३. फळातील गर ७६. मातीचे पात्र ७७. गर्दी, दाटी ७८. कोर्ट, न्यायालय ७९. पाश ८०. फणसाची दुसरा प्रकार ८२. तोरा, नक्षा ८३. देह, स्त्रियांचे एक कर्णभूषण ८५. गरीब, निर्धन ८७. पायरी ८८. एक्का, एकबैली गाडी, रेकला ८९. लहान ९०. शोध ९२. मौजेखातर छोटा प्रवास, ट्रीप ९४. केशतेल, कुमारी आसव वगैरेतली एक वनस्पती ९५. लांबचा रस्ता ९६. मुजरा ९८. नट्टापट्टा १००. राई १०१. मार्गस्थ १०३. कारस्थान १०५. शीतल १०६. सच्चा, प्रामाणिक १०७. शक, साल १०९. ईर्ष्या, चुरस •

**नवाकाळ कोडे क्रमांक १२६३चे उत्तर**

**आडवे शब्द** : १. जिवाभावाचा ५. कुमुद ७. टापशी १०. नेकी ११. राजी १२. टरफल १४. परवशता १६. टणत्कार १७. पर्णकुटी १९. उपाशी २०. बूड २२. गुरव २३. पखवाज २५. मजाल २६. आजवर २८. यमुना ३०. हाड ३१. पळ ३३. भौमवासर ३६. लाथ ३७. कर ३८. कणेदार ४०. तितर ४१. विनय ४२. यथावकाश ४५. चाक ४६. सडक ४८. मग ५०. टाच ५१. मीटर ५३. बलशाली ५४. बरका ५६. विमा ५८. कच्चा ५९. मूल ६०. पलंग ६१. टाकसाळ ६३. आळी ६६. बीमोड ६८. पितर ६९. कस ७०. अद्ययावत ७३. वज्रचूडेमंडित ७५. मढे ७६. वडीलधारा ७९. कनात ८१. एकी ८३. चकोर ८५. पाट ८८. खवचट ९०. पणजी ९१अ. पाठ ९२. अनवरत ९५. कपाट ९६. भावजय ९७. द्रूम ९८. चवड १००. चिंतन १०१. पोहे १०३. खतरनाक १०४. कास्तकार १०५. कूच १०६. सासर

**उभे शब्द** : १. जिराफ २. वाजी ३. वाराणशी ४. थोर ५. कुल ६. दयार्णव ७. टापटीप ८. पर ९. शीव १०. नेता १२. टरबूज १३. फत्ते १५. शत्रुंजय १६. टपाल १७. परडी १८. आदिनाथ १९. उजाड २१. डवरणे २४. खलास २५. महालय २६. आळ २७. गंमत २९. मुलायम ३१. परका ३२. पौर ३३. भौतिकशास्त्र ३४. वारस ३५. रविकर ३७. कवच ३९. दारा ४३. थाटामाटात ४४. शमी ४५. चाल ४७. डबलबी ४९. गवगवा ५२. टक्के ५३. बच्चा ५५. कापड ५७. ठोसा ५८. कळी ६२. करवत ६३. आसमंत ६४. वैद्य ६५. एवढेच ६७. मोजडी ६८. पिनाकपाणि ६९. कडे ७०. अतएव ७१. याम ७२. सांधा ७४. चूर्ण ७६. वरण भात ७७. लस्सी ७८. रामठ ८०. नाट ८२. कीचक ८४. कोप ८६. शान ८७. गौरव ८९. टपाल ९१. जीवन ९१अ. पायपोस ९२. अमर ९३. वचक ९४. तडका ९७. द्रूत ९९. नौका १००. चिंच १०२. हेर

# चीनची 'एमएसएस' सर्वात खतरनाक 'एफबीआय', 'मोसाद'ला मागे टाकले

पान १ वरून

अधिकारी म्हणतात की, अमेरिका हा चीनचा सर्वात मोठा शत्रू असला तरी एमएसएसचे पहिले लक्ष्य इतर देशांची सरकार नसून परदेशात राहणाऱ्या चिनी, विशेषतः अमेरिकेत राहणारे चिनी नागरिक हे आहे.

चीनचे राष्ट्राध्यक्ष क्षी जिनपिंग यांना विदेशातील चिनीकडून देशाला सर्वात मोठा धोका आहे, असे वाटत आहे. ते एखादे कारस्थान रचू शकतात किंवा शत्रू देशांच्या हेरगिरीच्या जाळ्यात सापडून जिनपिंग यांना अडचणीत आणेल, असे एखादे गुपित जगासमोर आणू शकतात. त्यामुळे एमएसएसने आपले जाळे विस्तारले आहे.

**बिजिंगची अदृश्य ताकद : एमएसएस**

एमएसएसची स्थापना १९८३ मध्ये झाली. ही संस्था बिजिंगची अदृश्य शक्ती म्हणून ओळखली जाते. बिजिंगच्या यिडोंगयुआन येथील सरकारी संकुलात तिचे मुख्यालय आहे. एमएसएस मुद्रेत चिनी कम्युनिस्ट पक्षाचे चिन्ह आहे. अधिकृत गणवेश इतर पीपल्स पोलिसांसारखाच आहे. कागदोपत्री तिचे कार्यक्षेत्र चीन, हाँगकाँग आणि मकाऊ दाखवण्यात आले आहे. तिच्यासाठी अंदाजे १,००,००० कर्मचारी काम करतात. चीनच्या राष्ट्रीय सुरक्षेची जबाबदारी तिच्यावर सोपवली आहे. चीनमधील आणि बाहेरील शत्रूची माहिती गोळा करणे, देशातील आर्थिक, सामाजिक आणि राजकीय घडामोडीवर लक्ष ठेवणे, शत्रू व इतर देशांच्या हालचालीवर नजर ठेवणे ही तिची नेमून दिलेली कामे आहेत.

खरे तर एमएमएस हे या संस्थेचे अधिकृत नाव नाही. किंबहुना तिचे कोणतेच अधिकृत नाव नाही. तिची ध्येयधोरणे, रचना, मोहिमा याबद्दल कोणतीही माहिती उपलब्ध नाही. आतापर्यंत तिचे नावही फारसे घेतले जात नव्हते. मात्र एमएसएसने चीनबाहेर अनेक हाय-प्रोफाईल गुप्त मोहिमा राबवल्या आहेत, असे सांगितले जाते. चीन पाश्चात्य देशांनी बनवलेली कोणतीही उपकरणे वापरत नसल्यामुळे या गुप्तचर संस्थेबद्दल माहिती मिळवणे कठीण आहे, असे सीआयएचे मत आहे.

एमएसएसने कमालीची गोपनीयता बाळगणे पसंत केले आहे आणि प्रकाशझोत टाळला आहे. मात्र अलीकडेच एमएसएसने 'राष्ट्रीय सुरक्षा शिक्षण दिना' निमित्त चिनी नागरिकांना एक व्हिडिओ संदेश पाठवला. परदेशी हेर सर्वत्र आहेत, असे शीर्षक असलेल्या या ३ मिनिटांच्या व्हिडिओमध्ये, एक चिनी माणूस, वेगवेगळ्या वेशात दाखवला आहे. या व्हिडिओला विचित्र पार्श्वसंगीत आहे. या व्हिडिओचा उद्देश चिनी लोकांना असा संदेश देणे होता की, त्यांनी प्रत्येक दुसऱ्या व्यक्तीकडे संशयाने पहावे आणि लोकांवर, विशेषतः बाहेरील लोकांवर आंधळेपणाने विश्वास ठेवू नये.

ऑगस्ट २०२३ मध्ये ब्रिटनच्या एमआय-फाईव्ह या गुप्तचर संस्थेचे महासंचालक केन मॅककलम म्हणाले होते की, चीनने ब्रिटनमधील २०,००० लोकांशी लिंकेडीनच्या माध्यमातून संवाद साधला आहे. फ्रान्स आणि जर्मनीनेही यापूर्वी असेच दावे केले आहेत. एमएमचा वाढता प्रभाव भारतासाठी डोकेदुखी ठरणार आहे. एमएसएस पाकिस्तानच्या आयएसआयच्या मदतीने भारतासाठी त्रासदायक कारवाया करू शकते.

# मुंबईला लुटणाऱ्या भ्रष्ट टोळीला मुंबईकर माफ करणार नाहीत

मुंबई

**मुंबईला** लुटणाऱ्या भ्रष्ट टोळीला मुंबईकर माफ करणार नाहीत, असा टोला काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी लगावला. ते म्हणाले की, पहिल्याच पावसात मुंबईकरांची दाणादाण उडाली असून मुंबईच्या रस्त्यांना तळ्याचे स्वरूप आले आहे. ठिकठिकाणी पाणी साचून मुंबई तुंबली आहे. रस्ते, हौसिंग सोसायट्या, रेल्वे ट्रॅक, अंडरग्राऊंड मेट्रो स्टेशन, रुग्णालये जलमय झाली आहेत. एका पावसाने भाजपा शिंदेसेना आणि अजित पवारांच्या भ्रष्ट कारभाराचे पितळ उघडे पडले आहे. यांचे कर्तृत्व इतके महान आहे की, आगामी निवडणुकीत लोकांची मते मागायला यांना बोटीनेच घरोघरी जावे लागेल असे दिसत आहे. मान्सूनपूर्व कामासाठी दरवर्षी महानगरपालिका कोट्यवधी रुपये खर्च करते, पण वस्तुस्थिती पाहता हे पैसे जातात कोठे? हा प्रश्न निर्माण होतो. मंत्रालय, मुंबई महापालिका प्रशासन, कंत्राटदार यांच्या भ्रष्ट युतीमुळे मुंबईचे हे हाल होत आहेत.

**हर्षवर्धन सपकाळ यांचा टोला**

# मुंबई विद्यापीठाच्या कॉलेजमध्ये १७ वर्षांनंतर पहिल्यांदा शुल्कवाढ

पान १ वरून – त्यानंतर प्रवेश प्रक्रिया सुरू होण्यापूर्वी परिपत्रकांद्वारे याची सूचना महाविद्यालयांना देण्यात आली आहे. राज्य सरकार मुंबई विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयातील शिक्षकांच्या वेतनासाठी अनुदान देते. मात्र महाविद्यालयांना कोणतेही अनुदान देत नाही. तसेच केवळ अनुदानित अभ्यासक्रमांच्या शिक्षकांसाठीच हे अनुदान देण्यात येते. त्यातच दिवसेंदिवस वाढत असलेल्या खर्चामुळे महाविद्यालयांना विनाअनुदानित अभ्यासक्रमांच्या शिक्षकांना वेतन देण्याकरिता तारेवरची कसरत करावी लागत आहे. त्यामुळे शुल्कामध्ये वाढ करण्याची मागणी महाविद्यालयांकडून होत होती.


**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

विभागाचे नाव:– माहिती व तंत्रज्ञान विभाग

निविदा सुचना क्र.०३ (२०२५–२६)

**कामाचे नाव:**– नाशिक महानगरपालिकेतील घरपट्टी – पाणीपट्टी कर संकलन करीता नागरिकांना Whatsapp व्दारे देयके उपलब्ध करुन देणे करीता पॅकेज पुरविणे बाबत.

**कामाचे प्राकलन र.रु–** ६४,९०,०००/–

इच्छुक निविदा धारकांनी सविस्तर माहिती साठी https://mahatenders.gov.in संकेतस्थळावर भेट दयावी.

जनसंपर्क/जा.क्र/९१/२०२५

दि.२६/०५/२०२५

Sd/-
उपआयुक्त
माहिती व तंत्रज्ञान विभाग,
नाशिक महानगरपालिका, नाशिक

सर्व नागरिकांनी पाणी काटकसरीने वापरावे.


# सुप्रीम कोर्टात फेरमोजणी! हा नियम निवडणुकीला का नाही?

पान ८ वरून

अध्यक्ष आणि अन्य कार्यकारी मंडळावरील पदाधिकाऱ्यांच्या निवडीसाठी मतदान झाले. मात्र एकूण मतदार आणि मतपेटीतील मते यामध्ये तफावत असल्याचा आरोप झाल्यानंतर हा प्रकार न्यायालयापुढे आला. न्या. सूर्यकांत आणि न्या. दिपांकर दत्ता यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणी सुनावणी झाली.

ही निवडणूक प्रक्रिया राबवण्याची जबाबदारी निवडणूक समितीवर सोपवण्यात आली होती. समितीच्या वतीने न्यायालयात बाजू मांडताना गैरप्रकार घडल्याच्या आरोपामुळे कोणत्याही उमेदवाराच्या मनात संशय निर्माण होऊ नये म्हणून फेर मतमोजणी करावी आणि महाप्रबंधकांच्या निगराणीखाली ही फेरमतमोजणी व्हावी, असे समितीच्या वकिलांनी सुचवले. खंडपीठाने त्याला होकार दिला. मात्र फेरमतमोजणीचे निकाल जाहीर करू नये. निकाल सर्वप्रथम न्यायालयाकडे सादर करावा, असे निर्देश न्यायालयाने दिले.

एका महिला वकिलाने निवडणूक समितीच्या कार्यपध्दतीवरही आक्षेप घेतला. सर्वोच्च न्यायालयाने निवडणुकीत महिलांसाठी ३३ टक्के आरक्षण देण्याचे निर्देश दिले असताना दोन ज्येष्ठ सदस्यांच्या जागा महिलांसाठी राखीव ठेवण्यात आल्या नाहीत, असा मुद्दा महिला वकिलाने मांडला. त्यावर २३ मे रोजी झालेल्या सुनावणीत खंडपीठाने मतदान प्रक्रियेचे सीसीटीव्ही फुटेज सादर करण्याचे आदेश निवडणूक समितीला दिले होते. याच याचिकेवर आता झालेल्या सुनावणीत फेरमतमोजणीचे आदेश न्यायालयाने दिले. हा संपूर्ण घटनाक्रम पाहता सार्वजनिक निवडणुकांचे स्मरण होते. सार्वजनिक निवडणुकांमध्ये सत्ताधाऱ्यांना सोयीची नसेल तर फेरमतमोजणीची मागणी सर्रास फेटाळली जाते. तिथे अशी तत्परता दाखवली जात नाही.


**विक्री सूचना**

**व्यावा अपेरेल्स (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनाअंतर्गत)**

नोंद. कार्या.: ए-२, योगी स्मृति, १ला मजला, पार्क रोड, विलेपार्ले (पूर्व), मुंबई, महाराष्ट्र, भारत - ४०००५७.

**परिसमापकः भारती डागा,**

**परिसमापकाचा पत्ताः** ९४बी, पलाश टॉवर, वीरा देसाई मार्ग, अंधेरी पश्चिम, मुंबई - ४०० ०५३. ईमेलः liquid.vavya@gmail.com

**ई-लिलाव**

नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ अन्वये संपत्तीची विक्री

**लिलावाचा दिनांक आणि वेळः** दि. २१.०६.२०२५ रोजी स. ११.०० ते दु. २.०० वाजेपर्यंत (प्रत्येकी ५ मिनिटांच्या अमर्यादित विस्तारासह)

माननीय राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबईद्वारे दिनांक २९ जून, २०२४ रोजीच्या आदेशानुसार नियुक्त परिसमापकाच्या ताब्यामधील व्यावा अपेरेल्स (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेडच्या परिसमापन संपत्तीचा भाग बनलेल्या व्यावा अपेरेल्स (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनाअंतर्गत) च्या मालकीच्या संपत्ती आणि मालमत्तांची विक्री. मालमत्तांची विक्री निम्नस्वाक्षरीकारांद्वारे ई-लिलाव प्लॅटफॉर्म https://ibbi.baanknet.com/eauction-ibbi/home मार्फत करण्यात येईल.

| संपत्ती | राखीव किंमत (रक्कम रु.मध्ये) | इसारा रक्कम (रक्कम रु. मध्ये) |
|---|---|---|
| बॅच १: | | |
| १. ग्रामपंचायत दापोडे, तलाठी साजा पुर्णा, तालुका भिवंडीचे उप-नोंदणीकरण आणि जिल्हा व विभाग ठाणेचे नोंदणीकरणच्या हद्दीमधील, गाव दापोडे, तालुका भिवंडी येथे स्थित वसलेल्या आणि असलेल्या सर्व्हे क्र. ७७/३/४/५, ९५/२, ३ पैकी, ३ पैकी, ३ पैकी, ३ पैकी, ९५/४, ५, ६ पैकी, ६ पैकी, ६ पैकी, ७, ८, ९, ९६/१, २, ३ पैकी, ३ पैकी, ४, ६, ७ पैकी, १०६/५ पैकी, १०७/१/१, १०७/१/२, १०७/२, ३, १०७/४पैकी, १०७/५पैकी, १०८/१, १०८/२, ३, ४, ५, १०९/१, २, ३, ४, ११०/पैकी, १११/१, २, ३, ११२/१, २/१, २/२, ३, ४, ५, ६, ७, ८, ११३/२, ११३/४ धारण केलेल्या एकत्रित अकृषिक जमिनीपैकी सर्व्हे क्र. ११३ हिस्सा क्र. २ धारण केलेल्या जमिनीमधील अविभक्त सामायिक हितसंबंधांसह खुल्या आकाशामध्ये बांधकामाच्या हक्कासह "क्रिष्णा कॉम्प्लेक्स"च्या इमारत क्र. ई/७मधील पहिल्या मजल्यावरील, व्यावा अपेरेल्स प्रायव्हेट लिमिटेडच्या मालकीच्या प्रस्तावित गोडाऊन क्र. १०३, १०४, १०५, १०६ आणि १०७ प्रत्येकी मोजमाप अदमासे २७५० चौ.फू. समतूल्य २५५.५७ चौ.मी. क्षेत्रफळ, एकूण मोजमाप अदमासे १३७५० चौ.फू. समतूल्य १२७७.८८ चौ.मी. क्षेत्रफळकरिता एफ.एस.आय.चे सर्व खंड आणि तुकडे | १,७०,१५,८५० | १७,०१,५८५ |
| बॅच २: | | |
| २. मुंबई नाशिक रोड, आसनगाव (पश्चिम), तालुका शहापूर, जिल्हा ठाणे येथील सर्व्हे क्र. १३५(भाग) आणि सर्व्हे क्र. १६६/ए, हिस्सा क्र. १ (भाग) धारण केलेल्या व्यावा अपेरेल्स प्रायव्हेट लिमिटेडच्या मालकीच्या जमीन, मोजमाप ८१४० चौ.मी.चे सर्व खंड आणि तुकडे आणि त्यावर बांधलेली गाळा क्र. १ आणि २ मोजमाप अदमासे २०,८५७ चौ.फू. बिल्टअप क्षेत्रफळ, गाळा क्र. ३ आणि ४, मोजमाप अदमासे २२,५४५ चौ.फू. क्षेत्रफळ आणि गाळा क्र. ५, मोजमाप अदमासे १४,३७६ चौ.फू. बिल्ट अप क्षेत्रफळ धारण केलेली, म्हणजेच तळमजला आणि पोटमाळा क्षेत्र मोजमाप ५७,७७८ चौ.फू. (बिल्ट-अप), गच्चीवरील कर्मचारी खोली आणि प्रसाधनगृह मोजमाप ४,८२६ चौ.फू. (बिल्ट-अप क्षेत्रफळ), तळमजल्यावरील उपहारगृह, स्टोरेज क्षेत्र, प्रसाधनगृह आणि वॉचमन केबिन मोजमाप ३,२४१ चौ.फू. (बिल्ट-अप क्षेत्रफळ) समाविष्ट असलेली इमारत. | ७,२४,६०८०० | ७२,४६,०८० |
| बॅच ३: | | |
| कपडे शिवण्याकरिता वापरात असलेली प्लान्ट आणि मशिनरी | १६,५८,२५० | १,६८,५२५ |

**ई-लिलावाच्या अटी आणि शर्ती खालील प्रमाणे**

१. ई-लिलाव मान्यताप्राप्त सेवा प्रदाता पीएसबी अलायन्स प्रा. लि.च्या मालकीच्या आणि त्यांच्याद्वारे संचालित असलेल्या ईबिक्रय प्लॅटफॉर्मद्वारे "जसे आहे जेथे आहे", "जसे आहे जे आहे" आणि "तेथे जे आहे तत्त्वावर" आयोजित करण्यात येईल.
२. संपत्तीचे तपशील, ऑनलाईन ई-लिलाव बोली अर्ज, उद्घोषणा आणि हमी अर्ज, ऑनलाईन लिलाव विक्रीच्या सर्वसाधारण अटी आणि शर्ती समाविष्ट असलेले संपूर्ण ई-लिलाव प्रक्रिया दस्तऐवज वेबसाईट https://baanknet.com/ वर उपलब्ध आहेत. **संपर्कः** टोल फ्री क्रमांक +९१ ८२९१२ २०२२०, ग्राहक सहाय्यः liquid.vavya@gmail.com; support.baanknet@psballiance.com.
३. ई-लिलाव प्रक्रिया दस्तऐवज दि. २९ मे, २०२५ पासून उपलब्ध होतील.
४. कोणीही बोलीदार यशस्वी न ठरल्यास, परिसमापकांनी कोणत्याही टप्प्यादरम्यान ई-लिलाव स्थगित करण्याचे हक्क राखून ठेवले आहेत.
५. ई-लिलाव बंद होण्याच्या वेळेच्या शेवटच्या ५ मिनिटांमध्ये जर बोली ठेवण्यात आल्यास, बंद होण्याचा वेळ आपोआपच अमर्यादित विस्तारासह, ५ मिनिटांनी वाढेल. जो बोलीदार ई-लिलाव प्रक्रिया बंद होताना उच्चतम बोली रक्कम (राखीव किमतीच्या खाली नाही) सादर करेल, त्याला यशस्वी बोलीदार घोषित करण्यात येईल आणि त्या संदर्भातील निरोप इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पारित करण्यात येईल जे परिसमापकाच्या मंजुरीच्या अधीन असेल.
६. लिलावास ठेवलेल्या कॉर्पोरेट ऋणकोच्या संदर्भातील लागू मुद्रांक शुल्क/हस्तांतरण प्रभार, शुल्क इ. आणि सर्व स्थानिक कर, शुल्क, दर, मूल्यांकन प्रभार, शुल्क इ. यशस्वी बोलीदाराने भरावयाचे आहेत.
७. कोणताही किंवा सर्व प्रस्ताव स्वीकारण्याचे किंवा फेटाळण्याचे किंवा कोणतेही कारण न दर्शविता कोणत्याही टप्प्यावर ई-लिलाव प्रक्रिया स्थगित करण्याचे/पुढे ढकलण्याचे/रद्द करण्याचे संपूर्ण हक्क परिसमापकास आहेत.
८. संपूर्ण विक्री मोबदला भरणा केल्यानंतर, विक्री प्रमाणपत्र/करारपत्र फक्त यशस्वी बोलीदाराच्या नावे पारित करण्यात येईल आणि अन्य कोणाच्या नावे पारित करण्यात येणार नाही.
९. विक्री नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६च्या तरतुदी आणि त्याअंतर्गत बनलेल्या विनियमनांच्या अधीन असेल.

सही/-
कु. भारती डागा
परिसमापक,
IBBI/IPA-001/IP/P-01963/2020-2021/13070
एएफए क्र.: AA1/13070/02/311225/107325
वैधताः ३१ डिसेंबर, २५ पर्यंत.

दिनांकः २७.०५.२०२५
ठिकाणः मुंबई



**फॉर्म जी**

**विशाल स्ट्रक्चरल्स प्रायव्हेट लिमिटेडकरिता स्वारस्य अभिव्यक्ती निमंत्रण**

अभियांत्रिकी, खरेदी आणि बांधकाम (ईपीसी) व्यवसायात कार्यरत
युनिट क्र.७०१-७०६, ७ वा मजला, कृष्णा- गोविंदा टॉवर प्लॉट क्र.२२-२६, सेक्टर २४, वाशी, सानपाडा रेल्वे स्टेशन समोर, नवी मुंबई, महाराष्ट्र, भारत, ४००७०५
(इन्सॉल्व्हेन्सी अँण्ड बँकरप्टसी बोर्ड ऑफ इंडिया (कॉर्पोरेट व्यक्तिंकरिता दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया) रेग्युलेशन्स, २०१६ चे नियम ३६ए चे उप-विनियमन(१) अन्वये)

| अ.क्र. | संबंधित तपशिल | |
|---|---|---|
| १ | कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव पॅन आणि सीआयएन/ एलएलपी क्रमांकासह | **विशाल स्ट्रक्चरल्स प्रायव्हेट लिमिटेड** (CIN: U28920MH1983PTC030252) **पॅन क्र.** - AAACV1486A |
| २ | नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता | युनिट क्र.७०१-७०६, ७ वा मजला, कृष्णा- गोविंदा टॉवर प्लॉट क्र.२२-२६, सेक्टर २४, वाशी, सानपाडा रेल्वे स्टेशन समोर, नवी मुंबई, महाराष्ट्र, भारत, ४००७०५ |
| ३. | वेबसाइटची युआरएल | एनए |
| ४ | ज्या ठिकाणी बहुसंख्य स्थिर मालमत्ता आहेत त्या ठिकाणाचे तपशील | कार्यालय प्रिमायसेस क्र.७०१ ते ७०६, कृष्णा गोविंदा टॉवरच्या ७ व्या मजल्यावर, प्लॉट क्र.२२-२६ वर, सेक्टर २४, वाशी, सानपाडा रेल्वे स्टेशन जवळ, ३७८४ चौ.फूट (सुपर बिल्ट अप) कार्यालय प्रिमायसेस क्र. ४०१, ४०४, ४०५ आणि ४०६ कृष्णा गोविंदा टॉवरच्या चौथ्या मजल्यावर, प्लॉट क्र.२२-२६ वर सेक्टर २४, वाशी, सानपाडा रेल्वे स्थानकाजवळ, १९१८ चौ. फूट (सुपर बिल्ट अप) प्लॉट क्र.४५, एमआयडीसी तळोजा (१००० चौ. मीटर) |
| ५ | मुख्य उत्पादने/सेवांची स्थापित क्षमता | कॉर्पोरेट कर्जदार अभियांत्रिकी, खरेदी आणि बांधकाम व्यवसायात कार्यरत होता. ते तेल क्षेत्रातील महारत्न सार्वजनिक क्षेत्रातील युनिट्ससाठी एक पात्र कंत्राटदार होते. त्यांनी एचपीसीएल, ओएनजीसी सारख्या कंपन्यांसाठी प्रकल्प राबवले आहेत. सध्या, कंपनीमध्ये कोणतेही ऑपरेशन्स/चालू प्रकल्प नाहीत. |
| ६ | मागील आर्थिक वर्षात विकल्या गेलेल्या मुख्य उत्पादनांचे/सेवांचे मूल्य | मार्च २०२४ रोजी संपलेल्या वित्तीय वर्षात कार्यचलनातून मिळणारा महसूल ३०,१०,६४,२५३/- रुपये होता. |
| ७ | कर्मचारी/कामगारांची संख्या | शून्य (सध्या कोणतेही कर्मचारी काम करत नाहीत) |
| ८ | दोन वर्षांचे शेवटचे उपलब्ध वित्तीय अहवाल (अनुसूचीसह), कर्जदारांच्या याद्या यासह अधिक तपशील युआरएल वर उपलब्ध आहेत: | दोन पर्यायांतर्गत स्वारस्य अभिव्यक्तीचे आवाहन केले जात आहे; १. संपूर्ण कॉर्पोरेट कर्जदार. किंवा २. इन्सॉल्व्हेन्सी अँण्ड बँकरप्टसी बोर्ड ऑफ इंडिया (कॉर्पोरेट व्यक्तिंकरिता दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया) रेग्युलेशन्स, २०१६ च्या नियम ३६बी(६ए) नुसार कॉर्पोरेट कर्जदाराच्या एक किंवा अधिक मालमत्तेसाठी म्हणजेच मालमत्तानिहाय ठराव. अधिक माहितीसाठी, कृपया स्वारस्य अभिव्यक्तीचे तपशीलवार आमंत्रण (खाली दिलेली लिंक) पहा. कॉर्पोरेट कर्जदाराच्या मालमत्तेच्या तपशीलांसह आणि प्रक्रियेच्या पुढील घटनांसाठी संबंधित तारखांसह, कृपया तपशीलवार स्वारस्य अभिव्यक्तीचे आमंत्रण पहा, जे येथे उपलब्ध आहे: www.ssarvi.com |
| ९ | संहितेच्या कलम २५(२)(एच) अंतर्गत रिझोल्यूशन अर्जदारांची पात्रता युआरएल वर उपलब्ध आहे: | ईमेल विनंती पाठवायची आहे:- cirp.vishalstructurals@gmail.com वर ईमेल करा तसेच www.ssarvi.com वर देखील उपलब्ध आहे. |
| १० | अभिव्यक्ती स्वारस्य प्राप्त करण्याची शेवटची तारीख | १० जून २०२५ |
| ११ | संभाव्य ठराव अर्जदारांची तात्पुरती यादी जारी करण्याची तारीख | २० जून २०२५ |
| १२ | तात्पुरत्या यादीवर हरकती सादर करण्याची शेवटची तारीख | २५ जून २०२५ |
| १३ | संभाव्य ठराव अर्जदारांची अंतिम यादी जारी करण्याची तारीख | ०५ जुलै २०२५ |
| १४. | संभाव्य रिझोल्यूशन अर्जदारांना माहिती ज्ञापन, मूल्यांकन मॅट्रिक्स आणि रिझोल्यूशन प्लॅनची विनंती जारी करण्याची तारीख | १० जुलै २०२५ |
| १५. | ठराव योजना सादर करण्याची अंतिम तारीख | ०९ ऑगस्ट २०२५ |
| १६. | स्वारस्य अभिव्यक्ती सादर करण्यासाठी ईमेल आयडीची प्रक्रिया करा | cirp.vishalstructurals@gmail.com |

**टिप : येथे नमूद केलेली माहिती सध्या रिझोल्यूशन प्रोफेशनलकडे उपलब्ध असलेल्या माहितीवर आधारित आहे. रिझोल्यूशन प्रोफेशनलकडून प्राप्त होणारी कोणतीही अतिरिक्त माहिती वेळोवेळी विनंती करणाऱ्या व्यक्तींना अ.क्र.९ वर नमूद केलेल्या ईमेल आयडीवर ईमेलद्वारे अपडेट केली जाईल.**

सीए प्रशांत जैन
विशाल स्ट्रक्चरल्स प्रायव्हेट लिमिटेडच्या बाबतीत रिझोल्यूशन प्रोफेशनल
नोंदणी क्र. : IBBI/IPA-001/IP-P01368/2018-19/12131
ए-५०१, शांती हाइट्स, प्लॉट क्र.२,३,९बी/१०, सेक्टर ११, कोपरखैरणे, नवी मुंबई - ४००७०९, महा.

**दिनांक: २७ मे २०२५**
**ठिकाण: मुंबई**


# मुंबईच्या किनाऱ्यावर ओएनजीसीने लावला तेल व वायू विहिरींचा शोध

पान १ वरून

४१३ बॅरल तेल आणि १५,१३२ घनमीटर गॅसचा प्रवाह होत होता. मुक्ता फॉर्मेशनमधील हे हायड्रोकार्बन यश पहिल्यांदाच ओएएलपी ब्लॉक MB-OSHP-२०२०/२ मध्ये आढळले आणि तिला 'सूर्यमणी' म्हणून घोषित केले. हा शोध एक स्वतंत्र फॉल्ट बाऊंड नोसल वैशिष्ट्य आहे आणि तो MB-OSHP-२०१८/१ ब्लॉकच्या पश्चिम भागात आहे. या विहिरीला 'वज्रमणी' असे नाव दिले गेले. मुंबई ऑफशोअर हे भारतातील सर्वात मोठे तेल आणि वायू क्षेत्र आहे. अरबी समुद्रात भारताच्या पश्चिम किनाऱ्यापासून १६० किमी अंतरावर असलेले मुंबई हाय हे देशाचे सर्वात मोठे आणि सर्वात समृद्ध ऑफशोअर तेल आणि वायू क्षेत्र आहे. हे क्षेत्र दररोज सुमारे १,३४,००० बॅरल उत्पादन करते, जे भारताच्या देशांतर्गत तेल उत्पादनाच्या ३५ टक्के आहे.

# माझ्याबरोबरचा सामना कठीण

पान १ वरून- त्यानिमित्ताने त्यांनी आपल्या मुळ राज्याला ही भेट दिल्याची चर्चा आहे. मोदी यांनी आपल्या भाषणात म्हटले आहे की, आज देशात रेल्वेचे सर्व तंत्रज्ञान उपलब्ध असून हे तंत्रज्ञान आपण इतर देशांना निर्यातही करत आहोत. देश निराशेच्या गर्तेतून बाहेर येत असून, उत्पादनांच्या क्षेत्रात वेगाने पुढे येत आहे. गुजरातच्या लोकांनी दिलेल्या आशीर्वादाच्या जोरावर मी आज देशाची सेवा करत आहे. यावेळी मोदी यांनी ऑपरेशन सिंदूरबाबतही उपस्थितांना माहिती दिली. ऑपरेशन सिंदूर एक सैन्य कारवाई नसून भारतीयांच्या भावनांची अभिव्यक्ती आहे, असेही ते म्हणाले.


**जाहिर नोटीस**

श्री.घीसुलाल बाबुलाल परमार (हस्तांतरी) असे निवेदन करते की, खोली दुकान न. १ बाबू तांबे चाळ न.१, पार्क साईट कॉलनी, विक्रोळी (पश्चिम), मुंबई- ४०००७९, ही खोली मोहम्मद जावेद मोहम्मद अली यांच्या नावे होती. दिनांक ०५/०९/२००८ मोहम्मद जावेद मोहम्मद अली यांच्याकडून घेतली व तसे शपथपत्र त्यावेळी त्यांच्याकडून घेण्यात आले. सदर खोली माझ्या नावे करण्यासाठी मी ऑनलाईन पध्दतीने महानगरपालिका एन विभाग, घाटकोपर येथे दि. २०/०५/ २०२५ रोजी ऑनलाईन अर्ज केलेला आहे. तसेच सदर खोलीचा ताबा मागील १० ते १२ वर्षापासून माझ्याकडे असून मी माझ्या कुटुंबासोबत यात वास्तव्यास आहे. त्यामुळे आता मोहम्मद जावेद मोहम्मद अली हे कोठे आहेत माहित नसल्यामुळे स्टॅम्प डयुटी रजिस्ट्रेशन साठी मी त्यांना आणू शकत नाही. तरी मोहम्मद जावेद मोहम्मद अली, यांच्या कायदेशीर वारसापैकी कोणास काही आक्षेप असल्यास ७ दिवसांच्या आत प्रशासकीय अधिकारी एन वॉर्ड, घाटकोपर यांच्या कार्यालयात संपर्क साधावा. तसेच ७ दिवसानंतर कोणाचाही आक्षेप नाही असे ग्राहय धरुण हस्तांतरण प्रकरण मंजुर करण्यात येईल.

**श्री.घीसुलाल बाबुलाल परमार**
खोली दुकान न. १ बाबू तांबे चाळ न.१,
पार्क साईट कॉलनी, विक्रोळी (पश्चिम),
मुंबई- ४०००७९